## दयाळू डॉक्टर

१९४२ सालची गोष्ट आहे. त्या काळी एमबीबीएस होण्याच्या आधी एलएमपी (लायसन्स्ड मेडिकल प्रॅक्टिशनर) ची डिग्री घ्यावी लागायची. तेव्हा माझे वडिल डॉ. आर. एच. कुलकर्णी २२ वर्षांचे होते. त्यांचं पोस्टिंग महाराष्ट्र कर्नाटकच्या सीमेवरच्या चंदगढ गावातल्या डिस्पेन्सरीमध्ये झालं होतं. तिथे फारसं काम नसायचं. मधूनमधून ताप किंवा इंजेक्शनसाठी कोणी आलं तर यायचं. वडिलांना तिथे कंटाळाच येत होता.

मग जुलै महिना उजाडला. एका रात्री पाऊस कोसळत होता. घराच्या दरवाजावर कोणीतरी जोरजोरात थापा मारल्या. बाहेरच्या निबिड अंधारात लाठ्या घेऊन आठ जण कांबळं पांघरुन उभे होते. दोन गाड्यादेखील उभ्या होत्या. त्यांनी माझ्या वडिलांना डॉकटरी सामान घेऊन सोबत चलण्याचा हुकूमच सोडला. मग धुवांधार पावसात दीड तासानं गाडया एका घरापाशी जाऊन थांबल्या. सगळीकडे मिट्ट काळोख होता. तशात त्या लाठीधारकांनी वडिलांना त्या घरात ढकलून एका १७ वर्षाच्या मुलीची डिलिव्हरी करण्याचा आदेश दिला. त्यांनी दाराला बाहेरुन कडी घातली. आत सर्वत्र काळोख होता. फक्त एक मिणमिणती चिमणी होती. मुलीजवळ एक म्हातारी बाई बसली होती आणि ती बहिरी होती.

माझे वडिल तरूण होते. त्यांना डिलिव्हरीचा वगैरे फारसा अनुभव नव्हता. त्यामुळे ते घाबरलेले होते. मुलगी त्या मानानं निश्चिंत होती. ती म्हणाली, डॉक्टर, मला जगायचं नाहीये. माझे वडिल जमीनदार आहेत. त्यांची ५०० एकर शेती आहे. मुलगी असल्यामुळे त्यांनी मला कधीच शाळेत पाठवलं नाही. मला शिकवायला घरीच एक शिक्षक ठेवले. कसं कोण जाणे पण माझं त्यांच्यावर प्रेम बसलं आणि मी गरोदर राहिले. शिक्षक स्वत:ला वाचवण्यासाठी पळून गेला. मूल पाडण्याचे सर्व देशी उपाय केले पण ते निष्फळ ठरले. शेवटी घराण्याची अब्रू वाचवण्यासाठी मला इथे या अंधाऱ्या घरात या बाईबरोबर ठेवलंय. माझी डिलिव्हरी करुच नका. बाहेर लाठी घेऊन बसलेल्या लोकांना सांगा की मला त्यासाठी बेळगांवला न्यायला लागेल. या दरम्यान माझा मृत्यूच होईल - मला फक्त मरायचंय हो..!

माझ्या वडिलांनी सांगितलं, डॉक्टरांचं काम रुग्णाचा जीव वाचवणं हे आहे, जीव घेणं हे नाही. मी माझ्याकडून तसेच प्रयत्न करेन. मग मेडिकलच्या शिक्षणाच्या दरम्यान शिकलेलं जितकं ज्ञान वापरता येईल तितकं त्यांनी वापरलं. तांदुळाच्या पोत्यावर एक चादर टाकून त्यांनी तात्पुरता पलंग बनवला आणि त्या मुलीची डिलिव्हरी केली. प्रतिकूल परिस्थितीत सामान्य लोकांमध्ये देखील असामान्य हिंमत येत असावी.

त्या मुलीने एका मुलीला जन्म दिला. जन्माला आल्यावर मूल रडतं पण या मुलीनं तसं काहीच केलं नाही. मुलीनं एका मुलीलाच जन्म दिल्यावर माझ्या वडिलांकडे खूप तक्रार केली, हा मुलगा झाला असता तर बरं झालं असतं. या मुलीला जिवंत करायचा प्रयत्न देखील करु नका. मोठी झाल्यावर माझं जे झालं तेच या मुलीचंही होईल वगैरे..!

पण डॉ. कुलकर्णी यांनी तिचं काहीएक ऐकलं नाही. एक डॉक्टर म्हणून जे काय करता येईल ते त्यांनी केलं. मुलीला उलटं धरुन तिच्या पाठीवर थापट्या दिल्या. मग ती जरा रडली. ती जिवंत असल्याचंच ते एक चांगलं लक्षण होतं.

जेव्हा डॉ. कुलकर्णी घराबाहेर पडले तेव्हा लाठीवाल्यांनी त्यांना १०० रुपये बक्षीस म्हणून दिले. १९४२ मध्ये ती मोठी रक्कम होती. कदाचित आजच्या दहा हजाराएवढी! पैसे मिळाल्यानंतर वडिलांनी त्या मुलीला मदत करण्याचा निश्चय केला. आपली उपकरणं राहिल्याचा बहाणा करुन ते परत घरात गेले.

त्या मुलीला त्यांनी ते १०० रुपये दिले आणि तिला म्हणाले, तू पुण्याला जा. तिथे एक नर्सिंग कॉलेज आहे. तिथला क्लार्क आपटे हा माझा मित्र आहे. त्याला जाऊन भेट आणि आरएचनं पाठवलंय असं सांग. तो तुला नक्की मदत करेल.

मग माझे वडिल ही घटना पूर्णपणे विसरुन गेले. काही वर्षांनंतर त्यांचं लग्न झालं. माझी आई शाळेत शिक्षिका होती. आईनं वाचवलेल्या पैशातूनच माझ्या वडिलांनी मुंबईला जाऊन एमबीबीएस केलं. आणि वयाच्या ४२व्या वर्षी गायनॉकॉलॉजीमध्ये एमएसही केलं. लोक माझ्या व डिलांनी नेहमी यावरून चेष्टा करायचे, मुली इतवया मोठ्या झाल्या. आता शिकून काय करणार ?

पण वडिलांना शिकण्याची जबरदस्त ओढ होती. त्यांच्या पहिल्या रुग्णाच्या अनुभवामुळेच त्यांना गायनॉकॉलॉजिस्ट व्हायचं होतं आणि इतर स्त्रियांना मदत करायची होती.

रिटायर झाल्यावरही वडिल परिषदांना जात असत आणि काही नवीन ज्ञान मिळालं तर घेत असत. एकदा ते औरंगाबादला गायनॉकॉलॉजिस्टच्या परिषदेला गेले होते. तिथे डॉक्टर चंद्रा हिनं अतिशय सुरेख भाषण केलं. त्यानं वडिल अत्यंत प्रभावित झाले. त्याबद्दल विचारलं असता डॉक्टर चंद्रा म्हणाल्या की त्या अनेक गावांमध्ये जाऊन स्त्रियांच्या आरोग्यावर काम करतात, त्यातून त्यांना हे सर्व ज्ञान प्राप्त झालंय.

या संभाषणादरम्यान वडिलांचा एक मित्र येऊन म्हणाला, आरएच तुझं कसं चाललंय? आरएच असं नाव ऐकताच डॉक्टर चंद्रा लगबगीनं वडिलांजवळ आली आणि तिनं विचारलं, तुम्ही कधी चंदगढ मध्ये काम केलंय ?

हो, हो.. खूप वर्षांपूर्वी.. असं वडिलांनी उत्तर दिलं.

सर, मग तर तुम्हाला माझ्या घरी यावंच लागेल. डॉक्टर चंद्रा त्यांना म्हणाल्या.

मुली, आपण आज प्रथमच भेटलोय. आपली फारशी ओळखही नाही. मग मी तुझ्या एकदम घरी कसा येऊ? असं वडिलांनी विचारलं.

नाही सर, तुम्ही चलाच.. माझ्या आईला त्यानं खूप आनंद होईल.

घरी पोचल्यावर काळेपांढरे केस असलेल्या एका मध्यवयीन महिलेनं वडिलांचे अक्षरशः पायच धरले.

ती म्हणाली, १९४२ साली तुम्ही पहिल्यांदा जिची डिलिव्हरी केली तीच मी.. ! तुम्ही सांगितल्यानुसार मी पुण्याला येऊन आपटे या वलार्कना भेटले. मी खरं तर १०वी पासही नव्हते, पण त्यांनी मला नर्सिंगच्या कोर्सला अॅड मिशन दिली. मग मी पुण्यात नर्स झाले. घरातल्या लोकांनी माझा पुण्यापर्यंत पाठलाग केला तेव्हा मी मुंबईला गेले. मी पोलिसांत जाण्याची धमकी दिल्यानंतर जरा माझ्या घरातले लोक गप्प बसले. मी माझ्या मुलीला शिकवलं आणि डॉक्टर व्हायला प्रोत्साहन दिलं. तिला गायनॉकॉलॉजिस्ट होऊन आरएच डॉक्टरांसारखी इतर स्त्रियांची सेवा कर.. असं सांगितलं.

कुठे आहे तुमची मुलगी ? वडिलांनी विचारलं.

ही चंद्राच माझी मुलगी आहे. मृत्यूपूर्वी एकदा तरी तुमचं दर्शन घडावं असं मला वाटत होतं. मी तुम्हाला शोधायचा खूप प्रयत्न केला. आपटे यांना संपर्क करायचा प्रयत्न केला पण दरम्यान त्यांचं निधन झालं. तुमचं पहिलं नाव रामचंद्र आहे. त्यावरुन मी मुलीचं नाव चंद्रा ठेवलं. चंद्राचं स्वतःचं एक हॉस्पिटल आहे. त्याचं नाव आहे आरएच हॉस्पिटल ! ती ३ रुग्णांकडून पैसे घेतले तर २ रुग्णांना मोफत औषधपाणी देते.

**(सुधा मूर्ति इन्फोसिस फाऊंडेशनची चेअरपर्सन आहे. १६ ऑगस्ट २०१३ ला ख्रिश्चन मे डिकल कॉलेज, वेल्लोर या ठिकाणच्या भाषणात त्यांनी ही कथा सांगितली होती.)**

**मराठी अनुवाद : नीलांबरी जोशी**